मंगळवार, २८ ऑगस्ट २०१८
तरुण भारत

# जंगलाबरोबरच वेगळी ओळख कला, संस्कृती जतन करणे गरजेचे!

**पर्यावरणतज्ज्ञ राजेंद्र केरकर यांचे प्रतिपादन | दोडामार्ग महाविद्यालयात पर्यावरण जागृती महोत्सव : भूगोल विभाग, निसर्ग मंचचे आयोजन**

वार्ताहर
झरेबांबर

वनसंपदा ही मोलाची आहे. याचे रक्षण करणे हे सर्व व्यक्तींचे कर्तव्य आहे. पश्चिम घाट व दोडामार्ग तालुक्यातील नष्ट होणाऱ्या वनसंपदेविषयी चिंता व्यक्त करताना रबर, अननस लागवडीच्या नावाखाली या जंगलातील स्थानिक व दुर्मीळ वनस्पती नष्ट होत आहे. हा वेग असा राहिला तर १० ते १५ वर्षात तालुक्यातील जंगल संपेल. त्याचा परिणाम, हवामान बदल, पावसाच्या प्रमाणात बदल, पीक उत्पादनात घट, पाण्याची घट होईल. तेव्हा आपले जगणे कठीण बनेल. या जंगलासह प्रत्येक गावाची असणारी वेगळी ओळख, कला, संस्कृती यांचेही जतन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पर्यावरण तज्ज्ञ प्रा. डॉ. राजेंद्र केरकर यांनी केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात भूगोल विभाग व निसर्ग मंचद्वारे आयोजित पर्यावरण जागृती माहितीपट महोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते.

**वनसंपदा मोलाची असून तिचे रक्षण केले पाहिजे!**

प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, आंतरराष्ट्रीयस्तरावर काम करणारे आशिश शहा, पर्यावरण तज्ज्ञ, सूर्यकांत गावकर, मंगेश गावकर उपस्थित होते.



दोडामार्ग : महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पर्यावरण तज्ज्ञ प्रा. राजेंद्र केरकर व सोबत मान्यवर. समीर ठाकुर

ज्युरासिक पार्क चित्रपट निर्मितीमध्ये मोलाचे योगदान देणारे व नॅशनल जीओग्राफोसाठी काम करणारे जागतिक कीर्तीचे पर्यावरण तज्ज्ञ आशिश शहा यांनी पश्चिम घाटातील वनसंपदा, प्राणी, पक्षी, विविधता, त्यांच्या हालचाली, त्यांची वैशिष्ट्ये, त्यांच्या जगण्याच्या पद्धती, त्यांच्या संरक्षणाची गरज याविषयी चित्रफीत विद्यार्थ्यांना दाखवून त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

सूर्यकांत गावकर यांनी गोवा व दोडामार्ग तालुक्यातील २०० रानफुलांचे संकलन केले आहे. ही फूल कधी फुलतात, त्यांचे वैशिष्ट्ये गुणधर्म त्यांचे उपयोग याची माहिती दिली. आजूबाजूच्या परिसरातील पान, फूल, फळपासून विविध सणासाठी, उत्सावासाठी, लग्नसमारंभात सजावट कशी करावी याची माहिती देऊन वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या सजावटी दाखवून प्लास्टिक कागद, कापड, थर्माकोल यावर खर्च होणारा पैसा कसा टाळता येऊ शकतो हे सांगून वेगवेगळे आकर्षक पुष्पगुच्छे कसे बनवावे व सजावट कशी करावी? यांचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखविले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.सोपान जाधव, प्रा. श्रीपाद पाडगावकर यांनी सहकार्य केले. प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रज्ञाकुमार गाथाडे, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. पाटील यांनी तर आभार विनोद सावंत यांनी मानले.

NAS / AR